कारागृह विभागांतर्गत निवासी व कार्यालयीन इमारतीच्या बांधकामास प्रशासकीय व सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः जेएलएम-१२१६/प्र.क्र.२८९/तुरुंग-२
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ७ फेब्रुवारी, २०१८.

<u>वाचा</u>

१) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अपोमसंवकामवनि/पुणे/१६१४/०४६६/कक्ष-८, दिनांक ०५.१०.२०१६.

<u>प्रस्तावना-</u>

राज्यातील कारागृहांमधील वाढती बंदीसंख्या व तसेच त्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या अडीअडचणी विचारात घेऊन कारागृहातील नवीन कारागृह, नवीन बॅरेक्स व इतर अनुषंगिक बांधकामे /दुरुस्ती ही कामे तातडीने करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा अंतर्गत बांधकामे महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित च्या मुख्य उद्दिष्टाशी सुसंगत आहे. राज्यातील कारागृह विभाग हा गृह विभागाचा भाग असल्याने कारागृहांतर्गत करण्यात येणाऱ्या बांधकामाची कामे पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळा मार्फत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णयः-</u>

राज्यातील नवीन कारागृह व सध्या असलेल्या सर्व कारागृहाशी निगडीत इमारतीचे बांधकाम /दुरुस्तीची कामे पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळा मार्फत करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. या पूर्वी ज्या कामांना प्रशासकीय मान्यता व निधी देण्यात आला आहे अशी चालू कामे पूर्वीप्रमाणेच सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येतील. जी कामे सध्या मंजूर असूनही प्रत्यक्षात सुरु झालेली नाहीत ती कामे पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळांच्यामार्फत यावीत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०७१६२७३०८९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Siddharth Vidyadhar Dhandore

Digitally signed by Siddharth Vidyadhar Dhandore
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=18c12c8352414c8a8937fd0998c9ca8d81b7ea489acfd971bb6de950e8d1d54f, serialNumber=5d16166df09e111cba9c7d5e4e321b340111df7b21c5b0fff0be638e80ea9a1b, cn=Siddharth Vidyadhar Dhandore
Date: 2018.02.07 16:31:19 +05'30'

(सि.वि.धांडोरे)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. पोलीस महासंचालक (कारागृह), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.३२.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, वरळी, मुंबई
४. अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५. विशेष पोलीस महानिरीक्षक (मुख्यालय) , महाराष्ट्र राज्य, पुणे,
६. विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई
७. कारागृह उपमहानिरीक्षक, (पश्चिम विभाग)/पुणे,
८. कारागृह उपमहानिरीक्षक, (मध्य विभाग)/औरंगाबाद,
९. कारागृह उपमहानिरीक्षक, (पूर्व विभाग)/नागपूर,
१०.सर्व कारागृह अधिक्षक, महाराष्ट्र राज्य
११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,
१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,
१३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१४.अवर सचिव (कार्यासन-१४६१), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१५.अवर सचिव, वित्त विभाग, (व्यय-८/अर्थसंकल्प-११), मंत्रालय, मुंबई-३२,
१६.उप सचिव/अवर सचिव (पोल-७/बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२,
१७.निवड नस्ती (तुरुंग-२).